**ठळक बातम्या**

- महाराष्ट्रातल्या आपद्ग्रस्त शेतकऱ्यांसाठी केंद्र सरकार सर्वतोपरी मदत देईल, असं केंद्रीय गृहमंत्र्यांचं आश्वासन
- पश्चिम बंगालमधे भूस्खलनाच्या घटनांमधे २३ जणांचा, तर नेपाळमध्ये मुसळधार पाऊस, भूस्खलन आणि पुरामुळे ४७ जणांचा मृत्यू
- शक्ती चक्रीवादळाच्या प्रभावामुळे उत्तर कोकणात जोरदार पावसाची शक्यता, मुंबई आणि कोकण किनारपट्टीला चक्रीवादळाचा इशारा
- अल ऐन मास्टर्स २०२५ बॅडमिंटन स्पर्धेत भारताच्या खेळाडूंनी पटकावलं महिला एकेरी आणि पुरुष दुहेरीचं  विजेतेपद
- महिला विश्वचषक क्रिकेट स्पर्धेत कोलंबो इथं सुरु असलेल्या सामन्यात भारताचं पाकिस्तानपुढं विजयासाठी २४८ धावांचं आव्हान

**आणि**

- शेष भारताला ९३ धावांनी हरवून विदर्भानं तिसऱ्यांदा पटकावलं इराणी चषकाचा विजेतेपद

**<><><><><>**

राज्यातल्या आपद्ग्रस्त शेतकऱ्यांसाठी केंद्र सरकार सर्वतोपरी मदत देईल असं आश्वासन केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी दिलं आहे. ते आज अहिल्यानगर जिल्ह्यात लोणी इथं ते शेतकरी मेळाव्यात बोलत होते

**.... होल्ड - बाईट- शहा - -**

केंद्र सरकारनं आर्थिक वर्ष २०२५-२६ साठी एकूण ३ हजार १३२ कोटी रुपयांच्या मदतीसाठी मान्यता दिली असून त्यापैकी १ हजार ६३१ कोटी

रुपयांच्या मदतीचं वितरण एप्रिल महिन्यात झाल्याची माहिती अमित शहा यांनी दिली. यात महाराष्ट्रासाठी २१५ कोटी रुपयांच्या विशेष पॅकेजचाही समावेश असल्याचं ते म्हणाले. कर्ज वसुलीला तात्पुरती स्थगिती देणं, विद्यार्थ्यांना परीक्षांमध्ये दिलासा देणं यांसारखे अनेक निर्णयही घेतल्याचं त्यांनी सांगितलं. शेतकऱ्यांना उत्पन्नाचं आणखी साधन मिळावं याकरता सहकारी साखर कारखान्यांनी गाळप बंद असताना इथेनॉल तसंच भाजीपाला आणि इतर उत्पादनांसाठी पुढाकार घ्यावा असं आवाहन अमित शहा यांनी केलं. पद्मश्री विठ्ठलराव विखे-पाटील तसंच पद्मभूषण बाळासाहेब विखे पाटील यांच्या पूर्णाकृती पुतळ्यांचं अनावरण त्यांनी केलं. प्रवरानगर सहकारी साखर कारखान्याच्या विस्तारित परिसराचं उद्घाटनही त्यांनी केलं. मुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस यावेळी उपस्थित होते. ते म्हणाले.

**... होल्ड- बाईट- मुख्यमंत्री - -**

उपमुख्यमंत्री अजित पवार तसंच उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचीही भाषणं यावेळी झाली.

**<><><><><>**

पश्चिम बंगालमधे मुसळधार पाऊस होत असून भूस्खलनाच्या घटनांमधे आतापर्यंत २३ जणांचा मृत्यू  झाला आहे. तिस्ता नदीला पूर आला आहे, राष्ट्रीय महामार्गांवर पाणी साचलं आहे. शेतात आणि घरात पाणी शिरलं आहे. एनडीआरएफची पथकं आपद्ग्रस्त भागात मदतकार्य करत आहेत.

राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू, प्रधानमंत्री नरेंद्र मोदी, पश्चिम बंगालच्या मुख्यमंत्री ममता बॅनर्जी यांनी या आपत्तीत झालेल्या जीवितहानीबद्दल दुःख व्यक्त केलं आहे, तसंच बचाव आणि मदतकार्य जलद व्हावं यासाठी सर्वतोपरी मदत करण्याचं आश्वासन दिलं आहे. ममता बॅनर्जी उद्या सर्वाधिक जीवितहानी झालेल्या मिरिक भागाचा दौरा करणार आहेत.

**<><><><><>**

नेपाळमध्ये मुसळधार पावसामुळे, भूस्खलन  आणि अचानक आलेल्या पुरामुळे रस्ते बंद झाले आहेत. पूल वाहून गेले असून शुक्रवारपासून आतापर्यंत किमान ४७ जणांचा मृत्यू झाला असल्याची माहिती, नेपाळ मधल्या राष्ट्रीय आपत्ती जोखीम निवारण आणि व्यवस्थापन प्राधिकरणाच्या प्रवक्त्यांनी दिली आहे. इलम या  सर्वाधिक प्रभावित जिल्ह्यामध्ये दरडी कोसळून किमान ३७ लोक दगावले आहेत. बेपत्ता व्यक्तींचा शोध आणि बचाव कार्य सुरू आहे.

नेपाळमध्ये झालेल्या जीवित आणि मालमत्ता हानी बद्दल प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी दुःख व्यक्त केले आहे.  या कठीण काळात भारत नेपाळच्या जनतेसोबत आणि सरकारसोबत उभा असल्याचं, त्यांनी समाजमाध्यमावर  म्हटलं आहे.

**<><><><><>**

ईशान्य अरबी समुद्रात निर्माण झालेल्या शक्ती या चक्रीवादळाची तीव्रता वाढत असून पुढच्या काही दिवसात ते अधिक शक्तिशाली होण्याची शक्यता हवामान विभागानं वर्तवली आहे. मुंबई, ठाणे, पालघर, रायगड, रत्नागिरी आणि सिंधुदुर्ग जिल्ह्यांसाठी चक्रीवादळाचा इशारा देण्यात आला आहे. येत्या मंगळवारपर्यंत उत्तर कोकण किनारपट्टी भागात जोरदार वाऱ्यांसह मुसळधार पाऊस पडण्याची शक्यता हवामान खात्यानं वर्तवली आहे. समुद्रात सध्या ताशी १०० किलोमीटर वेगानं वारे वाहत असल्यानं, मच्छिमारांनी ७ ऑक्टोबरपर्यंत समुद्रात जाऊ नये, असा इशारा दिला आहे. मराठवाड्याच्या काही भागात आज जोरदार वाऱ्यांसह पावसाची शक्यता वर्तवण्यात आली आहे. तर, विदर्भातल्या काही जिल्ह्यांना पावसाचा यलो अलर्ट देण्यात आला आहे. विदर्भ आणि मराठवाडा विभागात, सात ऑक्टोबरपर्यंत मुसळधार ते अतिमुसळधार पावसाची शक्यता आहे.

**<><><><><>**

वस्तू आणि सेवा परिषदेनं जीएसटी कररचनेत केलेल्या सुधारणा २२ सप्टेंबरपासून लागू झाल्या आहेत. आज ऐकूया जम्मू काश्मीरमधे होणाऱ्या याच्या परिणामाविषयी...

**---व्हीसी---**

*(नव्या जीएसटी सुधारणांमुळे जम्मू-काश्मीरमधल्या हस्तकला, शेती, पर्यटन आणि विशेष उत्पादनांच्या स्पर्धात्मकतेत वाढ होणार आहे. जीएसटीमधली ही करकपात जम्मू-काश्मीरच्या विविध क्षेत्रांमधल्या औद्योगिक विकासासाठी, पर्यटनवाढीसाठी आणि ग्रामीण जीवनाच्या उन्नतीसाठी सहाय्यभूत ठरणार आहे. भरतकाम, शाली, लाकडी कोरीव काम, दागिने, रेशमी गालिचे यांसारख्या कलाकृती आणि हस्तकला यावरचा कर १२ टक्क्यांवरून घटवून ५ टक्के केल्यानं या कलांच्या माध्यमातून निर्मिलेली उत्पादनं अधिक परवडणारी आणि विक्रीयोग्य ठरणार आहे. तसंच पर्यटन आणि हॉटेल भाड्यांवरचा जीएसटी दर १२ टक्क्यांवरून ५ टक्क्यांपर्यंत कमी झाल्यामुळे पर्यटन उद्योगाला चालना मिळेल.)*

**<><><><><>**

केंद्रीय आरोग्य सचिवांच्या अध्यक्षतेखाली आज नवीदिल्लीत राज्यं आणि केंद्रशासित प्रदेशांच्या आरोग्य तसंच मुख्य सचिवांची बैठक झाली. कफ सिरपच्या गुणवत्तेवर आणि तर्कसंगत वापरावर या उच्चस्तरीय बैठकीत चर्चा झाली. सर्व औषध उत्पादकांनी सुधारित शेड्युल 'एम' चं काटेकोर पालन करणं आवश्यक असल्याचं आरोग्य सचिवांनी या बैठकीत अधोरेखित केले. नियमांचे पालन न करणाऱ्या युनिट्सचे परवाने रद्द करावेत, असे निर्देशही त्यांनी दिले.

राज्यांना विशेषतः मुलांमध्ये कफ सिरपचा तर्कसंगत वापर करायचं आवाहन करण्यात आलं आहे.

**<><><><><>**

अबू धाबी इथं सुरू असलेल्या **अल ऐन मास्टर्स २०२५** बॅडमिंटन स्पर्धेत भारताची उदयोन्मुख महिला बॅडमिंटनपटू **श्रियान्शी वलिशेट्टी** हिनं महिला एकेरीचं, तर **हरिहरन अम्साकरुणन** आणि **अर्जुन मादथिल रामचंद्रन जोडीनं,** पुरुष दुहेरीचं विजेतेपद पटकावलं आहे. अंतिम फेरीत श्रियान्शीनं भारताच्याच **तसनीम** हिचा १५-२१, २२-२०,२२-२० असा ३ गेम्समध्ये पराभव केला. तर, पुरुष दुहेरीच्या अंतिम फेरीत **हरिहरन अम्साकरुणन** आणि **अर्जुन मादथिल**

**रामचंद्रन** जोडीनं इंडोनेशियाच्या रेमंड इंद्रा आणि निकोलस जोक्विन जोडीला, २१-१७, २१-१८ असं हरवलं.

**<><><><><>**

प्रथम वर्ग क्रिकेट मध्ये नागपूर इथं झालेल्या स्पर्धेत, विदर्भानं आज शेष भारत संघाचा ९३ धावांनी पराभव करत तिसऱ्यांदा इराणी चषकावर नाव कोरलं. विदर्भ क्रिकेट असोसिएशन स्टेडियमवर झालेल्या या पाच दिवसांच्या सामन्यात विदर्भानं पहिल्या डावात, अथर्व तायडेच्या १४३ आणि यश राठोडच्या ९१ धावांच्या जोरावर ३४२ धावा केल्या, तर शेष भारताचा डाव २१४ धावांवर आटोपला. दुसऱ्या डावात विदर्भानं २३२ धावा केल्या. त्यामुळे त्यांची एकूण आघाडी ३६० धावांची झाली. त्यानंतर, शेष भारताचा दुसरा डाव २६७ धावात गुंडाळला. हर्ष दुबेनं चार बळी घेतले.

**<><><><><>**

महिला विश्वचषक क्रिकेट स्पर्धेत आज कोलंबो इथं सुरु असलेल्या सामन्यात भारतानं पाकिस्तानपुढं विजयासाठी २४८ धावांचं आव्हान ठेवलं आहे. पाकिस्ताननं नाणेफेक जिंकून भारताला प्रथम फलंदाजीसाठी आमंत्रित केलं. भारतानं निर्धारित ५० षटकात सर्व गडी गमावून २४७ धावा केल्या. हरलीन देओलनं सर्वाधिक ४६ धावा केल्या. रिचा घोषनं नाबाद ३५ धावांचं योगदान दिलं.

शेवटची बातमी हाती आली तेव्हा पाकिस्तानच्या ८ व्या षटकात २ बाद १९ धावा झाल्या होत्या.

**<><><><><>**

दिव्यांगांच्या जागतिक ॲथलेटिक्स अजिंक्यपद स्पर्धेत भारताची सिमरन शर्मानं आज महिलांच्या २०० मीटर धावण्याच्या टी–12 प्रकारात कांस्य पदक पटकावलं. तिनं २४ पूर्णांक ४६ सेकंदांत धाव पूर्ण करत तिसरा क्रमांक मिळवला.

कोलंबियाच्या पेरेझ लोपेझ आणि ब्राझीलच्या बारोस दा सिल्वा यांनी अनुक्रमे सुवर्ण आणि रौप्य पदकं पटकावली. भारताची एकूण पदकसंख्या आता १९ झाली आहे.

**<><><><><>**

६८व्या राष्ट्रकुल संसद परिषदेमधे भारताचं प्रतिनिधीमंडळ, लोकसभेचे सभापती ओम बिरला यांच्या नेतृत्वाखाली सहभागी होणार आहे. राज्यसभेचे उपाध्यक्ष हरिवंश सिंह, २४ राज्यं आणि केंद्रशासित प्रदेशातले मिळून ३६ तालिका अध्यक्ष आणि १६ सचिव यांचा या पथकात समावेश आहे. महाराष्ट्रातून राज्यसभेवर निवडून गेलेले डॉ अजित गोपछडे देखील परिषदेत भाग घेतील. बार्बाडोसमधे ब्रिजटाऊन इथं आजपासून येत्या १२ ऑक्टोबरपर्यंत ही परिषद चालेल.

**//<><><><><>//**